# आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगांव बदलापूर

# अहवाल

## आदर्श महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, बदलापूर येथे आज दिनांक २१ जून २०२२ रोजी आंतराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम आदर्श महाविद्यालय बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात ओंकार प्रार्थना, शिथिलीकरण, प्राणायाम, सूर्य नमस्कार, योगमुद्रा, वज्रासन, भुजंगासन, इत्यादी आसने योग तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने योगासने केली.

प्रस्तुत कार्यक्रमात स्वामी विवेकानंद केंद्राच्या प्रमुख मा. मीनाताई देशपांडे , वैशाली बोकील, राजेश कुलकर्णी, समिधा राऊत, डॉ. कल्पना शर्मा, वृषाली जोशी, पूनम जोशी तसेच श्री. श्रीकांत गुळवणी आणि ईश्वरी ग्रामजोशी या सर्वांची सक्रिय उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी योगासनाचे महत्व समजावून सांगितले तसेच भविष्यात देखील योगासनाचे प्रशिक्षण वर्ग नियमितपणे महाविद्यालयात दिले जाईल असे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतकर कर्मचारी व १३९ विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. रा. से. योजनेचे प्रमुख श्री मंदार ठाकूर यांनी सर्वांचे आभार मानले त्यानंतर वंदे मातरम गायनाने कार्यक्रम समाप्त झाला.










